# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः06.05.2026** **वारःबुधवार**

---

1. उसाला प्रति क्विंटल 365 रुपये एफआरपी देण्यास केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी
2. आदिवासी क्षेत्रात स्वयंसेवी संस्थामार्फत चालवण्यात येणाऱ्या 5 प्राथमिक आणि 19 माध्यमिक अनुदानित आश्रमशाळांची श्रेणीवाढ करण्याचा राज्य मंत्रीमंडळाचा निर्णय
3. टेक वारी 2 अंतर्गत डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा आणि डाटा सुरक्षेबाबत मार्गदर्शन आणि
4. ठाण्यात एक कोटी 40 लाख रुपयांचे बनावट विदेशी मद्य जप्त, दोघांना अटक

**<u>एफआरपी-केंद्रीय मंत्रीमंडळ</u>**

ऊसाची एफआरपी 10 रुपयांनी वाढवून प्रति क्विंटल 365 रुपये करण्यास केंद्रीय मंत्रीमंडळानं काल मंजुरी दिली. यामुळं देशभरातल्या शेतकऱ्यांना 1 लाख कोटी रुपयांचा लाभ होईल, असं माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत सांगितलं. कापसाची उत्पादकता वाढवण्यासाठी कपास कांती या नव्या अभियानालाही मंत्रीमंडळानं मंजुरी दिली आहे. कापसाची प्रति हेक्टर उत्पादकता दुप्पट करण्याचं याचं उद्दिष्ट आहे. आगामी 5 वर्षांसाठी हे अभियान राबवलं जाणार आहे. याअंतर्गत देशभरात जिनिंग आणि प्रेसिंगचे 2 हजार केंद्र सुरू केलं जाणार आहेत. रबी हंगामात 8 लाख 19 हजार 882 मेट्रीक टन हरभऱ्याची खरेदी करायलाही सरकारनं मंजुरी दिली आहे. या खरेदीसाठी महिनाभराची मुदतवाढ देण्यात आली असून आता 29 मे पर्यंत राज्यात हरभरा खरेदी सुरू राहील, असंही वैष्णव यांनी सांगितलं.

**<u>मंत्रिमंडळ निर्णय</u>**

आदिवासी विकास विभागाअंतर्गत स्वयंसेवी संस्थांकडून चालविण्यात येणाऱ्या पाच प्राथमिक आश्रमशाळांची, माध्यमिक स्तरापर्यंत आणि 19 माध्यमिक शाळांची उच्च माध्यमिक अर्थात, कनिष्ठ महाविद्यालय स्तरापर्यंत श्रेणीवाढ करण्यास काल राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. या निर्णयामुळं राज्यातील डोंगराळ, दुर्गम भागातील आदिवासी बांधवांच्या मुलांचं शिक्षण गतीमान होणार आहे. राज्यातील दुर्गम आणि डोंगराळ भागातील आदिवासींमध्ये शिक्षणाचा प्रसार होण्यासाठी,1972-73 पासून आश्रमशाळा समूह योजनासुरु करण्यात आली. या योजनेंतर्गत सध्या स्वयंसेवी संस्थाकडून 556 अनुदानित आश्रमशाळा चालविल्या जातात.

सोलापूर इथं नवीन शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करायला आणि सोलापुरच्या शासकीय तंत्रनिकेतनमध्ये, शैक्षणिक वर्ष 2026-27 पासून पदवीस्तरावरचे प्रत्येकी साठ प्रवेश क्षमता असणारे तीन अभियांत्रिकी अभ्यासक्रम सुरु करायला देखील कालच्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. सोलापूरच्या शासकीय तंत्रनिकेतनाचं नाव बदलून, ते 'शासकीय अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान संस्था, सोलापूर' असं करण्यात आलं आहे.

धाराशिव जिल्ह्यातील, तुळजाभवानी मंदिर संस्थानमार्फत चालविण्यात येणारे श्री तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय राज्य शासनाच्या उच्च आणि तंत्र शिक्षण विभागाकडे कायमस्वरूपी हस्तांतरित करण्यास मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. आता हे महाविद्यालय श्री. तुळजाभवानी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, तुळजापूर, या नावानं ओळखले जाईल.

**टेक-वारी**

मुंबईत मंत्रालयात काल आयोजित, 'टेक-वारी 2.0'अंतर्गत डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा आणि सेवा या सत्रात प्रमुख वक्ते म्हणून नॅशनल पेमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडियाचे मुख्य संपर्क व्यवस्थापन भागीदार, नलिन बन्सल यांनी मार्गदर्शन केलं. वेगाने बदलणाऱ्या तंत्रज्ञानाच्या युगात कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा स्वीकारणंअत्यावश्यक असून देशात अजूनही डिजिटल प्रणालीपासून दूर असलेल्या मोठ्या वर्गाला तंत्रज्ञान समजावून सांगणं त्याबद्दल  विश्वास निर्माण करणं आणि त्यांच्यापर्यंत सेवा पोहोचवणेही मोठी जबाबदारी असल्याचं त्यांनी सांगितलं.

टेक वारी 2.0 प्रशिक्षण उपक्रमांतर्गत कालडिजिटल युगातील डेटा सुरक्षेच्या महत्त्वावर सर्वोच्च न्यायालयातील वकील खुशबू जैन यांनी मार्गदर्शन केलं. कृत्रिम बुद्धिमत्ता, सोशल मीडिया आणि डिजिटल व्यवहारांच्या वाढत्या वापरामुळे वैयक्तिक डेटाचे महत्त्व प्रचंड वाढले आहे. सायबर गुन्हे, डिजिटल अटक, फसवणूक, तसेच डेटा लीकच्या घटनांमुळे आजच्या डिजिटल युगात डेटा सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देणे आवश्यक असल्याचं यांनी सांगितलं.

**सह्याद्री व्याघ्र प्रकल्प**

सह्याद्री व्याघ्र प्रकल्पांतर्गत प्रस्तावित नवीन व्याघ्र मार्गिकेच्या नियोजनात, स्थानिक नागरिकांना आणि लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊन निर्णय घेण्यात यावेत असे निर्देश कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले आहेत. या संदर्भात काल कोल्हापुरात आयोजित करण्यात आलेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते. या प्रकल्पामुळे कोल्हापूरसह लगतच्या जिल्ह्यातील 550 हून अधिक गावांवर निर्बंध येण्याची शक्यता आहे. कोणत्याही प्रकल्पाची अंमलबजावणी करताना स्थानिकांना प्रक्रियेत सामावून घेणे आणि त्यांच्याशी सल्लामसलत करणे हे प्रशासनाचे कर्तव्य असल्याचे त्यांनी सांगितले.

**नवापुर-बर्ड फ्ल्यू**

नंदुरबार जिल्ह्यातील नवापूर तालुक्यात बर्ड फ्ल्यू अर्थात H5N1 चा प्रादुर्भाव गंभीर स्वरूप धारण करत असून कुक्कुटपालन व्यवसायाला त्याचा  मोठा फटका बसला आहे. गेल्या चार दिवसांत अंदाजे 1 लाख 93 हजारांहून अधिक कोंबड्या, 8 लाखांपेक्षा जास्त अंडी आणि सुमारे 21 टन पशुखाद्य नष्ट करण्यात आलं आहे. प्रशासनाने बाधित परिसरात निर्बंध लागू केले असून कुक्कुट उत्पादनांची वाहतूक आणि  विक्रीवर नियंत्रण ठेवण्यात येत आहे. सध्या पशुसंवर्धन विभागाचे सुमारे 50 कर्मचारी आणि विशेष पथकं परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी कार्यरत आहेत.नागरिकांनी घाबरून न जाता प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असं आवाहन करण्यात आलं आहे.

**पुणे-स्व-गणना**

16 व्या जनगणनेच्या अंतर्गत आतापर्यंत पुणे  जिल्ह्यातील 66 हजार 193 नागरिकांनी स्व-गणना केली आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली आहे. नागरिकांनी se.census.gov.in या अधिकृत

संकेतस्थळाचा वापर करुन 15 मे पर्यंत स्व-गणना पूर्ण करून या प्रक्रियेत सक्रियपणे सहभाग घ्यावा, असे आवाहन डुडी यांनी केलं आहे.

**<u>मुख्यमंत्री साह्यता निधी</u>**

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी आणि धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या माध्यमातून 1 एप्रिल 2025 ते 31 मार्च 2026 या कालावधीत नाशिक जिल्ह्यात 2 हजार 792 रुग्णांना सुमारे 23 कोटीहून अधिक रूपयांची मदत देण्यात आली आहे. ही योजना, गंभीर आजारांनी ग्रस्त आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांसाठी जीवनदायी ठरत असून जिल्ह्यात तिची अंमलबजावणी परिणामकारकरीत्या करण्यात येत आहे.

**<u>बनावट मद्य-ठाणे</u>**

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या ठाणे भरारी पथकानं काल ठाण्यात एक कोटी 40 लाखांच्या बनावट विदेशी मद्यासह एक कोटी 65 लाखांचा मुद्देमाल जप्त केला. औषधांच्या नावाखाली बनावट इनव्हॉइस तयार करून परराज्यातील भारतीय बनावटीच्या विदेशी मद्याची बेकायदेशीपणे तस्करी करण्यात येत होती. या प्रकरणी दोघांना अटक करण्यात आली आहे, अशी माहिती कोकण विभागीय उपायुक्त प्रदीप पवार यांनी दिली. ठाण्यातील आर. सी. पाटील टोल नाका ते माजिवाडा रोड दरम्यान बनावट विदेशी मद्याची बेकायदेशीरपणे वाहतूक होत असल्याची गोपनीय माहिती मिळाल्याच्या आधारे भरारी पथकानं सापळा रचून ही कारवाई केली.

**<u>अंधश्रद्धा जागृती-यवतमाळ</u>**

राज्यात अंधश्रद्धा, जादूटोणा यांना प्रतिबंध घालण्यासाठी आणि त्याचं समूळ उच्चाटन करण्यासाठी कायदा लागू आहे, मात्र त्यासाठी जनजागृती करण आवश्यक असून, या कायद्याबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्यावर भर द्यावा, असे निर्देश यवतमाळचे जिल्हाधिकारी विकास मीना यांनी दिले. या संदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीत ते बोलत होते. या कायद्याच्या जनजागृतीसाठी सामाजिक संस्थांचे सहकार्य घेत, शाळा आणि महाविद्यालयांत विविध उपक्रम राबवावेत अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

**<u>अवकाळी पाउस-हिंगोली-गडचिरोली</u>**

हिंगोली जिल्ह्यात काळ अवकाळी पावसाने हजेरी लावली. या पावसामुळे उकाड्यापासून काही अंशी दिलासा मिळाला असला तरी, हळद पिकाच मोठ्या प्रमाणावर नुकसान झालं. भिजलेल्या हळदीला कमी भाव मिळण्याची शक्यता असून, यात शेतकऱ्यांना फटका बसणार आहे. गडचिरोली शहरात काल वादळी वाऱ्यांसह पावसाच्या हलक्या सरी पडल्या.

**<u>हवामान</u>**

कोकण, मध्य महाराष्ट्र, आणि विदर्भात हवामान कोरडं राहील, तर मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याचा अंदाज हवामान खात्यानं वर्तवला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

## नमस्कार.